**<u>सूचना (NOTIFICATION)</u>**

**<u>महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१</u>**

म्हाडा सरळसेवा भरती २०२१ करीता परीक्षा घेण्यात येत असून दि.३१.०१.२०२२, दि.०१.०२.२०२२, दि.०२.०२.२०२२, व दि.०३.०२.२०२२ रोजी झालेल्या परीक्षेमध्ये काही उमेदवारांनी गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आले आहे. परीक्षेला आल्यानंतर सर्व उमेदवारांचे फ़ोटो काढले जातात. त्यांची खात्री पटल्यानंतरच परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जातो. संपूर्ण परीक्षेच्या दरम्यान प्रत्येक उमेदवार सी. सी. टी. व्ही. च्या कक्षेत असतो. परीक्षेमध्ये म्हाडा व टी. सी. एस. कडून घेण्यात येत असलेल्या दक्षतेमुळे तोतया उमेदवार पकडले. तोतया उमेदवार व ज्या उमेदवारांकरीता ते परीक्षा देत आहेत त्या उमेदवारांविरुध्द एफ़. आय. आर. दाखल करण्यात आला आहे. कोव्हीडच्या पार्श्वभूमीवर संशयास्पद उमेदवारांची अंगझडती घेण्यात येत होती. परंतु निदर्शनास आलेल्या गैरमार्गाच्या घटना विचारात घेऊन दि.०७.०२.२०२२, दि.०८.०२.२०२२ व दि.०९.०२.२०२२ रोजी होणा-या परीक्षेमध्ये सर्व उमेदवारांची Hand Held Metal Device द्वारे झड्ती घेण्यात येईल.

गुणवत्ता यादी मध्ये आलेल्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता बोलाविल्यानंतर तसेच निवड झाल्यास रुजू होताना त्यांनी परीक्षेचा अर्ज भरताना सादर केलेला फ़ोटो, परीक्षेला आल्यानंतर परीक्षा केंद्रावर त्यांचा घेतलेला फ़ोटो यांची खातरजमा करण्यात येईल. परीक्षा देताना त्यांचे करण्यात आलेले सी. सी. टी. व्ही. चित्रीकरण देखील तपासण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

| अ. क्र. | क्लस्टर | संवर्ग (पद) | एकूण सत्र | दिनांक | सत्र क्रमांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | कार्यकारी अभियंता<br>उप अभियंता<br>सहायक अभियंता | तीन | ३१.०१.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ)<br>१२.३० ते ०२.३० (दुपार)<br>०४.०० ते ०६.०० (संध्याकाळ) |
| २ | ३ | सहायक विधी सल्लागार | एक | ३१.०१.२०२२ | ०४.०० ते ०६.०० (संध्याकाळ) |
| ३ | ४ | कनिष्ठ अभियंता | ३ | ०१.०२.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ)<br>१२.३० ते ०२.३० (दुपार)<br>०४.०० ते ०६.०० (संध्याकाळ) |
| ४ | ७ | लघुटंकलेखक, भूमापक<br>अनुरेखक,<br>स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | २ | ०२.०२.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ)<br>१२.३० ते ०२.३० (दुपार) |
| ५ | २ | मिळकत व्यवस्थापक/ प्रशासकीय अधिकारी | १ | ०३.०२.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ) |
| ६ | ५ | कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहायक | १ | ०३.०२.२०२२ | १२.३० ते ०२.३० (दुपार) |
| ७ | ६ | सहायक, वरिष्ठ लिपीक,<br>कनिष्ठ लिपीक-टंकलेखक | नऊ | ०७.०२.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ)<br>१२.३० ते ०२.३० (दुपार)<br>०४.०० ते ०६.०० (संध्याकाळ) |
| | | | | ०८.०२.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ)<br>१२.३० ते ०२.३० (दुपार)<br>०४.०० ते ०६.०० (संध्याकाळ) |
| | | | | ०९.०२.२०२२ | ०९.०० ते ११.०० (सकाळ)<br>१२.३० ते ०२.३० (दुपार)<br>०४.०० ते ०६.०० (संध्याकाळ) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |